# प्रेसनोट

दि.१०/०२/२०२२

## महावितरण कार्यालय, उरुळीकांचन उपविभागातील उप-कार्यकारी अभियंत्यावर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | लोणी काळभोर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम - ७ |
| तक्रारदार | पुरूष, वय - ३९ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लोकसेवक — प्रदीप वासुदेव सुरवसे, वय - ४८ वर्षे<br>पद — उप कार्यकारी अभियंता, वर्ग - २, महावितरण कार्यालय, ऊरूळीकांचन उपविभाग ता. हवेली जिल्हा पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २५,०००/- ( पंचवीस हजार रूपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | २०,०००/- (वीस हजार रूपये) |

पडताळणी व सापळा दिनांक :- १०/०२/२०२२.
ठिकाण:- ऊरूळीकांचन महावितरण कार्यालयामध्ये.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार हे इलेक्ट्रीक ठेकेदार असून त्यांचेकडील ग्राहकाचे ओपन प्लॉटमध्ये ट्रान्सफार्मर कनेक्शन घेण्यासाठी अंदाजपत्रक तयार करून पास करून पुढील कार्यालयास पाठविण्यासाठी लोकसेवक उप कार्यकारी अभियंता सुरवसे यानी २५ हजार रूपये लाचेची मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता तक्रारदारांकडील ग्राहकाचे ओपन प्लॉटमध्ये ट्रान्सफार्मर कनेक्शन घेण्यासाठी अंदाजपत्रक तयार करून पास करून पुढील कार्यालयास पाठविण्यासाठी आरोपी लोकसेवक यानी तडजोडीअंती २० हजार रूपये लाच मागणी करून स्वीकारली म्हणून वरीलप्रमाणे गुन्हा करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटच्या पोलीस उप अधीक्षक सीमा आडनाईक तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे व श्री. सुहास नाडगौडा, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे — ७८७५३३३३३३ ४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७. ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.